# प्रेस नोट दि.२६/०५/२०१९

## उच्च शिक्षीत मुलीसोबत अश्लील वर्तन करणारा आरोपी सीसीटीव्ही कॅमे-याच्या आधारे हडपसर पोलीसांच्या जाळयात

दिनांक २४/०५/१९ रोजी ॲमनोरा टाउनशिप मध्ये सकाळी सुमारे ०७.०० वाजेच्या सुमारास एक उच्च शिक्षीत मुलगी तिच्या कुत्र्याला फिरवत असतांना एका तरुणाने अचानक तिच्या समोर येवुन स्वतःची पॅन्ट काढुन सदर मुलीला आपला प्रायव्हेट पार्ट दाखवुन तिचा विनयभंग करुन पळुन गेला म्हणुन हडपसर पोलीस स्टेशन येथे विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. सदर गुन्हयाचा तपास मा.वपोनि सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली तपासपथकातील सपोनि लोणारे व त्यांचे पथकाने यांनी सुरु करण्यात आला होता. सदरचा इसम हा अनळोखी होता व त्याइसमाबाबत काहीही एक उपयुक्त माहीती मिळत नव्हती सदरचा आरोपी हा अनोळखी असुन पिडीत मुलीकडुन मिळालेल्या आरोपीचे फक्त वर्णन व गाडीचा रंग व मेक या माहीतीच्या आधारावर तपास सुरु करण्यात आलेला होता.

मा.पोलीस आयुक्त सो. यांच्या संकल्पनेतुन पुणे शहरामध्ये लोकसहभागातुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु करण्यात आलेला असुन सदरच्या प्रकल्पाच्या माध्यमातुन हडपसर पोलीस स्टेशनच्या हदीत आजपावेतो सुमारे १३०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे हे लोकसहभागातुन बसविण्यात आलेले आहेत व आणखी कॅमेरे बसविण्याचे काम चालु आहे.

सदर गुन्हयाचा तपास करतांना दोन दिवस तपासपथकातील कर्मचारी पोशि/शाहीद शेख, पोना/ गणेश दळवी, पोशि/ अनिल कुसाळकर, पोशि/ अमित कांबळे व पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते यांनी लोकसहभागातुन बसविण्यात आलेले सीसीटीव्हीच्या आधारे ॲमनोरामधील सुमारे ९४ कॅमेरे व बाहेरील समारे २१ कॅमेरे असे ११५ सीसीटीव्ही कॅमेरे तपासुन आरोपी निष्पन्न करुन आरोपीचा मार्ग शोधुन काढुन आरोपीच्या वर्णनावरुन व त्याने वापरलेल्या गाडीच्या वर्णनावरुन तसेच सीसीटीव्हीमध्ये दिसलेल्या गाडीच्या नंबरवरुन आरटीओ कडुन माहीती काढुन आरोपीस दोन दिवसानंतर हडपसर पोलीस आरोपीस जेरबंद करण्यात यशस्वी झाले आहेत. सदर आरोपीचे नाव गौरीशंकर अमुल्यकुमार महापात्रा वय-३५ रा. माळवाडी तुपेनगर, हडपसर असे असुन सदरचा आरोपी हा उच्च शिक्षीत असुन तो व्होडाफोन कंपनीत उच्च पदावर नोकरीस आहे. दिनांक २४/०५/१९ रोजी सकाळी त्याने ॲमनोरा टाउनशिपमध्ये केलेला प्रकार मान्य केला असुन त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदरचा गुन्हा हा फक्त सीसीटीव्ही च्या आधारावर उघडकीस आलेला आहे.

सदरची कामगीरी ही मा.सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ ५ पुणे शहर व सहा.पोलीस आयुक्त श्री.सुनिल देशमुख, हडपसर विभाग यांचे सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली तपासपथकाचे सहा.पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, सपोनि संजय चव्हाण, पोहवा/ युसुफ पठाण, पोहवा/ औचारे, पोना/ सदोबा भोजराव, पोना/ गणेश दळवी, पोना/ प्रमोद टिळेकर, पोना/ प्रताप गायकवाड, पोशि/ शशिकांत नाळे, पोशि/अकबर शेख, पोशि/अनिल कुसाळकर, पोशि/ अमित कांबळे, पोशि/ शाहीद शेख, पोशि/ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.